दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com    lakshamaha.dhule@gmail.com    lakshamaha.nsk@gmail.com

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे

डेली सर्व्हिस - इंदौर, मुंबई, पुणे, अहमदाबाद, नागपूर, अमरावती, अकोला

लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.

2x1 A/C स्लीपर कोच

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ थे ▶ अंक : २२ वा ▶ रविवार दि. २६ नोव्हेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## न्यूज कॉलम

### उद्धव ठाकरेंच्या पक्षात जोरदार इनकमिंग

**मुंबई ।** मुंबई, ठाणे आणि पालघरच्या शेकडो कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेच्या ठाकरे गटात प्रवेश केला आहे. ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानी या शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला.

### हेंद्रूणला किराणा दुकानात चोरी

**धुळे ।** तालुक्यातील हेंद्रूण येथे किराणा दुकान फोडून चोरट्यांनी रोकडसह तेलाचे डबे, वजन काटे असा एकुण १४ हजारांचा माल लंपास केला. याबाबत बापु रूपसिंग नवसारे (वय २८ रा. इंदिरा नगर, जि.प.शाळेच्या पाठीमागे, हेंद्रूण) याने मोहाडी पोलिसात तक्रार दिली आहे. त्यानुसार, त्यांचे किराणा दुकान असून दि. २३ रोजी रात्री ९ ते दि. २४ रोजी पहाटे पाच वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या शटरच्या दोन्ही बापुस असलेल्या कुलूप लावण्याच्या गोल कड्या तोडून आत प्रवेश केला. ५ हजारांची रोकड, ७ हजारांचे तेलाचे दोन डबे, १ हजार ९७० रूपयांची चिल्लर व ८०० रूपयांचे दोन वजनकाटे असा १४ हजार ७७० रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

# काँग्रेसला बुथवर देखील माणसं मिळणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण करा

## भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकत्यांना आवाहन

**धुळे । प्रतिनिधी**

काँग्रेसला बुथवर देखील माणसं मिळणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण करा, असं आवाहन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकत्यांना केलं आहे. तसंच खासदार सुभाष भामरे यांच्याकडे बघत आता तुमचंही काही खरं नाही आणि आमचंही, असं वक्तव्य केल्यामुळे चर्चांना उधाण आलं आहे. चंद्रशेखर बावनकुळे धुळे दौऱ्यावर असून होते त्यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमीपूजन करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन संसदभवनाची निर्मिती केल्यानंतर सर्वात प्रथम महिला खासदारांची संख्या वाढवण्यासंदर्भात निर्णय घेतला. या निर्णयाची आठवण करून देताना व्यासपीठावर बसलेले खासदार सुभाष भामरे यांना आता तुमचंही काही खरं नाही आणि माझंही काही खरं नाही असे वक्तव्य बावनकुळे यांनी केलं आहे. महिला खासदारांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतल्यामुळे १९१ महिला खासदारांची संख्या होणार आहे. त्यातच खासदार सुभाष भामरे यांच्याकडे बघत चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे वक्तव्य केल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. यावेळी कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना आवाहन करताना ते म्हणाले, काँग्रेसला बुथवर देखील माणसं मिळणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण करा. निवडणुका जवळ येतायेत त्या दृष्टीने कामाला लागा. तसेच जायकवाडी धरणाचे पाणी मराठवाड्याला सोडून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्याला मोठं वरदान दिलं असल्याची भावना देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली.

सर्वांगीण विकास हा भाजपचा अजेंडा आहे. धुळे शहराचा चौफेर विकास करण्याचे स्वप्न गजेंद्र अंपळकरार यांच्यासारखे पदाधिकारी पाहतात आणि ते प्रत्यक्षात उतरवतात. तेव्हा हीच भाजपसाठी मोठी संजीवनी ठरते असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. धुळे येथील चाळीसगाव रोडवरील मारुती नगरमध्ये भारतीय जनता पक्षाच्या महानगर कार्यालयाचे भूमिपूजन तसेच हर हर महादेव व्यायाम शाळेचे भूमिपूजनही करण्यात आले.

भारतीय जनता पक्षाचा धुळ्यात अत्यंत विक्रमी वेगाने विस्तार झाला. अवघे तीन नगरसेवक असलेल्या पक्षाने अनुप अग्रवाल शहर जिल्हाध्यक्ष झाल्यावर प्रचंड उभारी घेतली. पक्षाची ध्येय धोरणे समजवून सांगत इतर पक्षातील वजनदार नेत्यांचे होलसेलमध्ये प्रवेश सोहळे घडवून आणले. त्यानंतर महापालिकेत एकहाती सत्ता मिळविण्याचा विक्रमही त्यांनी साधला. मनपाच्या सत्तेचे सुकाणू आपल्या हाती घेत अग्रवाल यांनी शहरात विविध विकासाच्या कामांना गती दिली. त्यांच्या संकल्पनेतून पांझरानदी किनारी चौपाटी येथे अत्यंत सुंदर असे उद्यान उभारण्यात आले. लेझर शो सह डोळे दीपविणारे हे उद्यान असून आज लोकार्पण सोहळा चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते व ना.गिरीश महान, विजय चौधरी, खा.डॉ.सुभाष भामरे, जयकुमार रावल, आ.अमरिशभाई पटेल, माजी आ.राजवर्धन कदमबांडे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, विधानसभा प्रमुख अनुप अग्रवाल,महापौर प्रतिभा चौधरी, आयुक्त श्रीमती अमिता दगडे पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



### भाजपच्या हायटेक भवनाचे भूमीपुजन

भारतीय जनता पक्षाच्या शहर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी गजेंद्र अंपळकर यांना मिळाल्यानंतर त्यांनी पक्षासाठी मोठी भुमीका घेतली. खा.डॉ.सुभाष भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली गजेंद्र अंपळकर यांची धुळ्यातील राजकीय वाटचाल सुरु असताना त्यांनी पक्षासाठी मोठा निर्णय घेतला. गजेंद्र अंपळकर,अंपळकर कुटूंबियांनी स्वमालकीची चाळीसगाव रोडवरील मोक्याची पाच कोटी रुपये बाजारमुल्य असलेली जागा पक्षाला मोफत देण्याचे औदार्य दाखविले. पक्षासाठी हायटेक कार्यालय, या जागेवर उभारले जाणार आहे.पक्ष कार्यालयाचे भुमीपूजन सोहळ्यासाठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.



### ७ कोटींच्या उद्यानाचे झाले लोकार्पण;

महापालिकेतर्फे सुमारे सात कोटी रुपये खर्चातून साकारलेल्या पांझरा नदीकिनाऱ्यावरील चौपाटी येथील उद्यानाचा लोकार्पण भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. भाजपचे महामंत्री विजय चौधरी, खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमाला आमदार जयकुमार रावल, आमदार अमरिशभाई पटेल, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजपचे विधानसभाप्रमुख अनुप अग्रवाल, महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर, आमदार फारूक शाह, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, महापौर प्रतिभा चौधरी, उपमहापौर वैशाली वराडे, आयुक्त अमिता दगडे-पाटील, स्थायी समिती सभापती किरण कुलेवार, सभागृहनेत्या भारती माळी, विरोधी पक्षनेत्या कल्पना महाले, महिला व बालकल्याण समिती सभापती सारिका अग्रवाल, उपसभापती विमल पाटील, उद्यान असलेल्या प्रभागातील नगरसेवक तथा माजी उपमहापौर नागसेन बोरसे, नगरसेविका पुष्पा बोरसे, नगरसेवक कांतिलाल दाळवाले आदीची उपस्थिती होती.



### भूलभुलय्या, लेझर शोचे आकर्षण

शासनाच्या मूलभूत सेवासुविधा निधी व मनपा विकास शुल्क निधीतून पांझरा नदीकिनारी चौपाटी येथील उद्यानाचे काम महापालिकेने हाती घेतले. शासनाच्या मूलभूत सेवा सुविधा निधींतर्गत सुमारे पाच कोटी व धुळे मनपा विकास निधींतर्गत सुमारे दोन कोटी अशा एकूण सात कोटी निधीतून हे उद्यान पूर्णत्वास आले आहे.

# महामार्गावरील स्क्रॅप ठिकाणांवर छापा

## ७७ लाखांचा मुद्देमाल जप्त, तब्बल २० दुकान मालकांवर गुन्हा दाखल

**धुळे । प्रतिनिधी**



धुळ्यात महामार्गालगतच्या परिसरात स्क्रॅपिंगचा धंदा जोरदार चालतो. या धंद्यात दिवसाकाठी कोट्यवधींची उलाढाल होते. चोरीसह जुनाट वाहने बेकायदेशीरपणे बाहेरून आणायची आणि क्षणात स्क्रॅप करायची; अशी 'मोडस् ऑपरेंडी' वापरून वाहनांची विल्हेवाट लावली जाते. नूतन एसपी श्रीकांत धिवरे यांनी पद्भार घेताच मोहाडी पोलिसांनी स्क्रॅप व्यावसायिकांना मोठा दणका दिला आहे. जवळपास २० दुकानदारांकडून ७७ लाखांचा मुद्देमाल घावला आहे.

खरेतर स्क्रॅपिंगचा धंदा अगदी बिनदास्तपणे चालतो. याच धंद्याच्या बळावर अनेक जण पोसले जातात. मुंबई-आग्रा महामार्गावर काही दुकानांमध्ये अनधिकृतपणे वाहन स्क्रॅपिंगचे काम सुरू असल्याची खबर अतिरिक्त पोलीस अधीक्षक किशोर काळे यांना काल सायंकाळी ६ वाजता मिळाली. त्यांनी तात्काळ ही खबर मोहाडी पोलीस ठाण्याचे निरीक्षक शशिकांत पाटील यांना कळविली. त्यानुसार तेथे धाड टाकण्यात आली असता २० ते २२ पत्री दुकानांच्या परिसरात वाहन स्क्रॅपिंग होताना आढळून आले. यात वाहनाचे इंजिन, चेचिस, रेडीएटर, कॅबिन, बॉडी असे पार्ट मिळालेत. याविषयी दुकानदारांकडे चौकशी केली असता त्यांना नीट उत्तरे देता आली नाहीत. शिवाय, आरटीओची परवानगी नसतानाही वाहन स्क्रॅपिंग होत असल्याचे निष्पन्न झाले. छापा टाकलेल्या स्थळांवर वाहनांची तोडणी ही अवैधपणे सुरू होती. सदर वाहनं हे चोरीचे असल्याचा संशय येताच मोहाडी पोलिसांनी १९ जणांविरूद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी वारीस अली अहमद खान, सगीर खान शब्बीर खान,अझहरअली रोनक अली, अख्तरअली अकबर अली, अख्तरअली अकबर अली, मजहर अली रोनक अली, असगर अली रोन अली, सिराज अली जाफर अली, अझहरअली रोनक अली सर्व रा.मुल्ला कॉलनी, चाळीसगावरोड, धुळे, असगरअली अकबरअली मोहम्मद रफीक मोहम्मद हाशिफ रा.धुळे, गुलाम नबी दस्तगिर शेख, रा.कबीरगंज, वडजाईरोड, धुळे, अख्तर अली गुलाम हुसैन, मोहम्मद हुसैन लियाकत अली धुळे, अहमद हुसैन रा.जामचा मळा, नाल्याकिनारी,धुळे, तुफेल अहमद शेख रा.जामचा मळा, नाल्याकिनारी, धुळे, एहसान पुर्ण नाव निष्पन्न नाही रा.धुळे, कौसर अली पुर्ण नाव निष्पन्न नाही, सगीर शेख, , आझाद भाई रा.सुलतानिया मदरसामागे, धुळे व जाफरअली रा.मुल्ला कॉलनी, धुळे यांच्याविरूद्ध कारवाई केली आहे.

# आमच्या लोकांना अटक करण्याचे कारण काय

## पाटलांचा एकनाथ शिंदे सरकारला सवाल

**धुळे । प्रतिनिधी**



जालन्याच्या आंतरवाली सराटीतील पोलिसांवरील दगडफेकीप्रकरणी ४ जणांना अटक करण्यात आली आहे. त्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सरकारने आमच्या काही लोकांना अटक केली आहे. त्यांच्या अटकेचे कारण काय? सरकारचा यामागे कोणता डाव आहे? असा प्रश्न त्यांनी यासंबंधी सरकारला केला आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी आपल्या तोंडाला कुलूप लावले तर आम्ही ते लावून घेऊन, असेही जरांगे यांनी म्हटले आहे.

मराठा आरक्षणासाठी आंतरवाली सराटीत सुरू असणाऱ्या आंदोलनावेळी पोलिसांवर दगडफेक झाली होती. या प्रकरणी पोलिसांनी जालन्यातून ४ जणांना अटक केली आहे. या प्रकरणी मुख्य आरोपी असणाऱ्या एका व्यक्तीकडे पिस्तुल व जिवंत काडतूसे सापडली आहेत. त्यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे. या पार्श्र्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सरकारने आंतरवाली कार्यकर्त्यांना अटक करणार नसल्याचे आश्र्वासन दिले होते. मग आमच्या लोकांना अटक करण्याचे कारण काय? आमच्या लोकांना अटक करून आम्हाला बदनाम करण्याचा डाव सरकारने रचला आहे का? आमच्यावर अन्याय झाल्याचे सांगून तुमच्या कार्यकर्त्यांना अटक करणार नाही, असे सरकारने सांगितले होते. पण आता आमच्या कार्यकर्त्यांना अटक केली जात आहे. यामागे कोणता तरी डाव आहे हे स्पष्ट आहे, असे पाटील यांनी या प्रकरणी म्हटले आहे.

# अनमोल नगरात घरफोडी करणारे जेरबंद



**धुळे । प्रतिनिधी**

देवपूर परिसरातील अनमोल नगरात घरफोडी करणार्या दोघांना अवघ्या ७२ तासांत जेरबंद करण्यात एलसीबीला यश आले आहे. या कारवाईत ७१ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल पथकाच्या हाती लागला. एलसीबीच्या या सुपरफास्ट डिटेक्शनचे पोलीस दलातून कौतुक होत आहे.

दि.१९ ते २१ नोव्हेंबर दरम्यान मिलींद यशवंतराव देसले (५५) रा.अनमोल नगर, देवपूर, धुळे यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी देवघरातील ९६ हजार रूपये किंमतीच्या चांदीसह पितळी मुर्त्या लंपास केल्या. दि.२२ नोव्हेंबर रोजी मिलींद देसले यांनी पश्चिम देवपूर पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. त्यानुसार पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात चोरट्यांवर भादंवि कलम ३८०,४५७ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. घटनेचे गांभीर्य पहाता जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी धुळे एलसीबीचे पोलीस निरिक्षक दत्तात्रय शिंदे यांना गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने धुळे एलसीबीचे पोनि.दत्तात्रय शिंदे तपास सुरू केला. तपासादरम्यान साहील शरीफ बेग रा.मोगलाई, धुळे व रूपम दिनेश सोनवणे रा.नकाणेरोड, देवपूर, धुळे यांनी सदर गुन्हा केला असून ते स्नेहनगर येथे उभे असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पोनि.शिंदे यांनी पथकास कारवाई करण्याच्या सुचना केल्या. पथकाने

स्नेहनगरातील खांडल विप्र भवनाजवळ सापळा रचुन दोघांना शिताफीने पकडले. अधिक चौकशीत दोघांनी गुन्ह्याची कबुलीही दिली. पथकाने दोघांच्या ताब्यातील ६८ हजार रूपये किंमतीच्या चांदीच्या सहा मुर्त्या तसेच तीन हजार रूपये किंमतीची पितळी गाईची मुर्ती असा एकूण ७१ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांचे मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरिक्षक दत्तात्रय शिंदे, पोसई बाळासाहेब सूर्यवंशी, पोसई.अमरजीत मोरे, असई श्याम निकम, पोहेकॉ प्रकाश सोनार, हेमंत बोरसे, संदीप पाटील, योगेश चव्हाण, सुरेश भालेराव, पोना प्रल्हाद वाघ, मायुस सोनवणे, तुषार सूर्यवंशी, पोकॉ योगेश साळवे यांच्या पथकाने केली.

# संत रविदास गार्डन मधील लेझर कारंजे चार दिवसासाठी भाड्याने आणून धुळेकरांचे मनोरंजन

## शिवसेना उ.बा.ठा. वतीने तीव्र आंदोलन

**धुळे । प्रतिनिधी**

नदी किनारी उद्यान साकारले आहे. मात्र, या कामात प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचा आरोप उबाठा शिवसेनेने केला आहे. शिवसेनेचे महानगरप्रमुख धीरज पाटील यांनी फेसबुक लाईव्हद्वारे धुळेकरांचे लक्ष वेधून भ्रष्टाचारासह मनपाच्या दळभ्रदी वृत्तीवर आसूड ओढले. नूतन उद्यानाजवळील वाळलेले वृक्ष, खड्ड्यात हरवलेला रस्ता, आजूबाजू जमलेला कचरा डेपो हे दाखवून सत्ताधार्यांची कोंडी केली.

भाजपाचे मा. आ. अनिल गोटे यांनी पांझरा नदी किनारी अत्यंत सुंदर चौपाटी साकारली. धुळेकरांसाठी ते एक मनोरंजनाचे स्थान होते. याठिकाणी गोटेंनी जवळपास ७०० वृक्ष लावले, रस्ता तयार केला. मात्र, गेल्या सात वर्षांत मनपाने या वृक्षांकडे ढुंकून बघितलेले नाही. तेथेच बांधकामाचा राडारोडा टाकला जातो, यामुळे परिसराला कचर्याचे स्वरूप आले आहे. भाजपाचे नेते दिवंगत उत्तमराव पाटील यांच्या स्मारकाच्या भोवती काटेरी झाडे-झुडपे वाढलेली आहेत. त्याचेही सोयरसुतक भाजपाला नाही. शिवाय, पांझरेच्या दुतर्फा तयार केलेले रस्तेही खराब झाले आहेत. त्याद्वारे शासनाच्या निधीचे प्रचंड नुकसान झाले. विशेष म्हणजे पांझरा चौपाटीजवळील उद्यान हे महापौर प्रतिभाताई चौधरी यांच्या वार्डात येते. मात्र, त्यांनीही रस्त्याकडे, स्वच्छतेकडे दुर्लक्ष केले. बगिचा उद्घाटनासाठी भाजपाने लगबग चालवलेली आहे. कहर म्हणजे गार्डनमध्ये भाडोत्री तत्वाने लेझर शो आणि रंगीत कारंजे आणण्यात आले आहेत. विकासकामाला सेनेचा विरोध नसुन मात्र, यातील भ्रष्टाचाराला आपला प्रखर विरोध असल्याचे उबाठा सेनेने म्हटले आहे. पांझरा चौपाटी, खराब रस्ते, अस्वच्छतेसह संत रविदास उद्यानाच्या परिसरातील दुरवस्था चव्हाट्यावर आणण्यासाठी हे आंदोलन करीत असल्याचे सेनेकडून स्पष्ट करण्यात आले. ठिय्या आंदोलनप्रसंगी भाजपाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आजच्या आंदोलनात शिवसेना उपनेत्या शुभांगी पाटील, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, किरण जोंधळे, धीरज पाटील, डॉ. सुशील महाजन, भरत मोरे, ललित माळी, गुलाब माळी, विनोद जगताप, अण्णा फुलपगारे, शरद गोसावी, संदीप चव्हाण, राजु ढवळे, अमजद पठाण, छोटू माळी, प्रवीण साळवे, सुनील चौधरी, अजय चौधरी, आरिफ शहा, शत्रुघ्न तावडे, मुन्ना अन्सारी आदी सहभागी झाले होते.



### उद्यानातील भ्रष्टाचाराविरोधात सेनेचे आंदोलन!

पांझरा नदी किनारी साकारलेल्या उद्यानात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. तेथील टाईल्स उखडलेल्या आहेत, झाडांची वाढ खुंटलेली आहे. भीतींना तडे गेलेले आहेत. त्याविरोधात सेनेने यापुर्वीही आंदोलन केले होते. मात्र, तिकडे साफ दुर्लक्ष करण्यात आले. आता भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे येत असल्याने गार्डन परिसरात स्वच्छता मोहिम राबविली जात आहे. या वृत्तीचाही सेनेने निषेध केला.

# संदीप कर्णिक यांनी स्वीकारला नाशिक पोलीस आयुक्तपदाचा पदभार

**नाशिक । प्रतिनिधी**

पुण्याचे सहआयुक्त संदीप कर्णिक यांनी नाशिकच्या पोलीस आयुक्त पदाचा पदभार तत्कालीन आयुक्त अंकुश शिंदे यांच्याकडून स्वीकारला. सर्वप्रथम त्यांनी नाशिकचे ग्रामदैवत कालिका मंदिरात जाऊन दर्शन घेत आयुक्तालयात प्रवेश केला.

यावेळी माध्यमांशी संवाद साधतांना नवनियुक्त पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी सांगितले की, तत्कालीन आयुक्त अंकुश शिंदे यांनी नाशकात चांगले काम केले आहे. नाशकात वाहतुकीसह कायदा आणि सुव्यवस्थेचे सर्व प्रश्र्न सोडविण्यासाठी सर्वांशी चर्चा करून पाऊले उचलले जातील. आगामी लोकसभा व विधानसभा तसेच अन्य निवडणुका आणि राजकीय घडामोडी बघता आवश्यक ती पावले उचलली जातील. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरिता वेळ पडल्यास कठोर पाऊलेदेखील उचलले जातील. यावेळी त्यांनी महिला सुरक्षेकडे विशेष लक्ष देऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे सांगितले. कर्णिक यांनी पुण्यात असताना नागरिकांचा थेट पोलीस आयुक्तांशी संवाद व्हावा याकरिता व्हाट्सअप नंबर जारी केला होता. त्याच पार्श्र्वभूमीवर नाशिकमधील नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्याकरिता व्हाट्सअप नंबर जारी करण्याबाबत विचाराधीन असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## प्रचारातली मुक्ताफळे

राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर केलेल्या वक्तव्यावर आक्षेप घेत भाजपने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. त्यावर आयोगाने राहुल यांना नोटीस पाठवली आहे.

पाच राज्यांतील विधानसभेची निवडणूक आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. निवडणुकीच्या प्रचारात भाजप आणि काँग्रेसच्या नेत्यांनी परस्परांच्या विरोधात आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या आणि शेलक्या विशेषणांनी एकमेकांचा उद्धारही केला. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी हेही प्रचारात उतरले. राजस्तानमधील सभेत बोलताना त्यांनी काँग्रेस म्हणजे भ्रष्टाचाराचे प्रतीक असल्याची टीका केली. काँग्रेसच्या काही नेते आणि मंत्र्यांकडून महिलांवर अत्याचार होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. काँग्रेस म्हणजे भ्रष्टाचार, तुष्टीकरण आणि घराणेशाही अशी व्याख्याही त्यांनी ऐकवली, तर तेलंगणातील प्रचारसभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तिथले मुख्यमंत्री के सी आर हे देशातील भ्रष्टाचारातील शिरोमणी असल्याची टीका केली. निवडणुकीच्या प्रचारापासून सोनिया गांधी वयोमानामुळे सक्रिय नाहीत. काँग्रेसच्या प्रचाराची धुरा त्यांचे चिरंजीव राहुल आणि कन्या प्रियांका यांच्यावरच आहे. पक्षाध्यक्ष खर्गे काही प्रचारसभातून दिसले खरे; पण चर्चा झाली ती राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांना उद्देशून केलेल्या 'पनवती' या विशेषणाची ! क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून भारतीय संघाचा पराभव झाला. आधीचे दहा सामने भारतीय संघाने जिंकले होते. या अंतिम सामन्यासाठी मोदी उपस्थित असल्यानेच भारतीय संघ हरला असे तर्कट लावून राहुल यांनी मोदी म्हणजे पनवती असे त्यांना संबोधले. पनवती या शब्दाचा अर्थ राहुल गांधी यांना माहीत नसावा, असे दिसते; पनवती म्हणजे अशुभ, अपशकुन, नाट लावणारा, पांढर्या पायाचा. खरे तर असा शब्द वापरून राहुल यांनी आपली अवैज्ञानिक मानसिकताच दाखवली आहे. मोदींच्या उपस्थितीने भारतीय संघ हरला म्हणून ते अपशकुनी ठरतात का ? शेवटी खेळ कोणताही असला तरी त्यात हार-जीत होत असते. पराभवाच्या किंवा विजयाचे श्रेय कोणाच्या उपस्थितीने ठरत नसते. मग या आधी झालेल्या निवडणुकातील काँग्रेसच्या पराभवाला राहुल गांधींची पनवती लागली असे म्हणायचे का?

पातळी घसरली

मोदी यांची उपस्थिती हे सामना हरण्याचे जसे कारण ठरू शकत नाही, तसेच राहुल गांधींनी केलेल्या प्रचारामुळे काँग्रेसचा पराभव झाला असेही म्हणता येणार नाही. शेवटच्या सामन्याच्या वेळी मोदी यांनी उपस्थित राहून हरलेल्या भारतीय संघाला धीर देऊन त्यांचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न मोदी यांनी केला. जिंकलेल्या दहा सामन्यांबद्दल त्यांचे कौतुक केले यात त्यांचे काय चुकले ? मोदी यांच्यावर केल्या जाणार्या वैयक्तिक टीकेमुळे काँग्रेसचे मोठे नुकसान याआधी झाले आहे. गुजरातच्या निवडणुकीत सोनिया गांधींनी मोदी यांना 'मौत के सौदागर' म्हटले होते, तर मणिशंकर अय्यर यांनी 'चायवाला', आणि 'नीच' म्हटले होते. अशा शब्दांचे भांडवल कसे करून घ्यायचे याची उत्तम कला भाजपच्या नेत्यांना आहे. वादग्रस्त विधानाचा फायदा भाजपने याआधीही घेतला आहे. प्रचारात पक्षाची ध्येय धोरणे सांगणे, जनहिताच्या कार्यक्रमाची रूपरेषा मांडणे, विरोधी पक्षाच्या चुकीच्या आणि जनहित विरोधी धोरणावर टीका करणे हे अपेक्षित असताना परस्परांना दूषणे देण्यात, उणीदुणी काढण्यात आणि एकमेकांना शेलकी विशेषणे देण्यात धन्यता मानली जाते. राहुल गांधींनी पंतप्रधान मोदींना उद्देशून पीएम म्हणजे पनौती मोदी, पाकीटमार अशी विशेषणे वापरल्याने या बेछूट विधानाचा, नकारात्मक टिप्पणीचा भाजप प्रचारासाठी वापर करणार हे स्पष्ट आहे. यापूर्वीही मोदींवरील प्रत्येक नकारात्मक टिप्पणीचा भाजपने मुद्दा बनवला असूनही काँग्रेस तीच चूक पुन्हा का करते हा खरा प्रश्न आहे. राहुल गांधी यांचा 'पप्पू' असा उल्लेख करणे असो किंवा वैयक्तिक टीका टिप्पणी करणे हे समर्थनीय ठरत नाही. गेल्या लोकसभा निवडणुकीत चौकीदार चोर है, ही राहुल गांधींची घोषणा त्यांच्या अंगाशी आली. काँग्रेसला निवडणुकीत मार खावा लागला. मोदी आडनावाचे लोक चोर असतात हे त्यांचे विधान काही काळासाठी का होईना त्यांची खासदारकी जाण्यास निमित्त ठरले. भारत जोडो यात्रेत 'मोहबतवाली दुकान' चालवणार्या राहुल गांधींचा विवेक आणि परिपक्वता मोदींवर टीका करताना कोठे हरवून जाते हेच कळत नाही.

## बालपणीच्या आठवणीतला बुधवारचा बाजार!

माझ्या लहानपणी दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या पूर्ण सुट्ट्या आम्ही माझ्या आजोळी कुसुंब्याला घालवत असू. माझ्या आजोबांचे हॉटेल होते. हॉटेलच्या परिसरात कुसुंबा गावचा आठवडे बाजार बुधवारी भरायचा .आठवडी बाजाराचे संपूर्ण गावालाच आकर्षण होते. आजोबांच्या हॉटेलवर बुधवारच्या बाजाराची तयारी मंगळवार पासून बाजाराची सुरू व्हायची ,भजी साठी भरपूर कांदे कापून ठेवणे तसेच इतर सर्व फराळ तयार करून ठेवणे इत्यादी कामांची लगबग सुरू असे .सकाळी सहानंतर हळूहळू बाजारात दुकाने यायला सुरुवात होई. फिरस्ते दुकानदार आपले सामान बैलगाडीतून ,टेम्पोतून आणत. कुलूप दुरुस्ती ,विक्री व चाबी बनवून घ्यायचे दुकान, रेडिमेट कपड्याचे दुकान, कपड्यांचे दुकान ,विविध खाद्यपदार्थांचे दुकान ,भाजीपाला ,फळे ,किराणामाल, धान्य ,घरगुती वापराच्या वस्तू ,शेतीसाठी च्या वस्तू ,मटण ,चिकन, मासे ,मुलांची खेळणी , चप्पल ,बूट विक्री चे दुकान, धान्याच्या विक्रीचे दुकान,कितीतरी दुकाने! सकाळी आल्यावर ते फिरस्ते दुकानदार आपले दुकान आपल्या नेहमीच्या जागी मांडीत व चहा नाश्ता करता आजोबांच्या हॉटेलवर येत .आजोबा त्यांच्याशी आठवडाभरातल्या घडामोडींवर बोलत. फिरस्ते दुकानदार आजूबाजूच्या पंचक्रोशीत दररोज वेगळ्या गावांना आठवडी बाजारात दुकान लावीत. वर्षानुवर्ष चालत राहिलेल्या व्यवसायामुळे आजोबा आणि त्यांच्यात एका कुटुंबासारखी बोलणे होई. नऊ वाजेपर्यंत बहुतेक सर्व दुकानदार येऊन त्यांनी दुकान थाटलेले असे.कुसुंबे गावाच्या आजूबाजूला



असलेल्या पंचक्रोशीतील गावातून लोक बाजारा करता येत. गावातील जवळ जवळ प्रत्येक घरातून आठवड्याभरा करता भाजीपाला व विविध वस्तूंची खरेदी होई. दुपारी बारा एक वाजेपर्यंत संपूर्ण बाजारात प्रचंड गर्दी होई. दोन्ही हातात पिशव्या धरलेल्या महिला, त्यांच्या बरोबरचे लहान मुले ,काहीतरी आईकडे मागणारे ,रडणारे मुले, आठवडाभराच्या कामातून थोडासा निवांत पण म्हणून बाजारात आलेले मजुर पुरुष महिला खरेदीचा आनंद घेताना दिसत. तेव्हा गावाकडे फारशी हॉटेल नव्हती, आजूबाजूच्या गावातील शेतकरी ,मजूर आपल्या कुटुंबाकरता बाजारातील हॉटेलमधून गोड शेव ,जिलेबी चिवडा , भेळ घेत. गावातील शेतकरी गहू ,बाजरी डाळी विकायला बाजारात येत. आजोबांच्या हॉटेलवरही आता खूप गर्दी झालीली असे. अनेक दुकानदार, बाजारा करीता आलेले लोक दुपारचे जेवण ,फराळ करत. अनेक मजूर मिसळ व भजीसोबत त्यांच्या घरून आणलेली चटणी-भाकर खात. आजोबा मध्ये मध्ये भजी काढा ,कप बशी उचला , हॉटेलमध्ये उगीच रेंगाळलेल्या लोकांना झाले की तुमचे असे विचारीत.बाजारातील दुकानदारांना गर्दी सांभाळून , आपले दुकानाकडे व्यवस्थित लक्ष देऊन, वेगाने विक्री करायचा अतिशय चांगला अनुभव होता . सर्व दुकानदारांकडे नेटिव्ह इंटेलिजन्स अतिशय उत्तम होता.चप्पल, बूट ,लहान मुलांचे कपडे दुकानासमोरच घालून बघत फटाफट खरेदी विक्री होत असे. गावातील शेतकरी आपला भाजीपाला विकून दोन पैसे मिळवण्याचा प्रयत्न करीत असत. बाजारात गावतली महिला पुरुष भेटत, एकमेकांशी गप्पा होत ,आठवड्याभराच्या घडामोडी एकमेकाला सांगत ,घरी बोलवायचे आमंत्रण देत बाजारात पुढे सरकत असत. आठवडे बाजाराच्या आधी मजुरांना गावात मजुरी देण्याची पद्धत असल्यामुळे मजूरही आनंदात असत. आठवड्याभराच्या बाजारा बरोबरच चिकन, मासे ,मटन यांची खरेदी होई. आता बाजारात तीन चार वाजलेले असत. आता गर्दीने आपले शिखर गाठलेली असे . विक्रेत्यांची आरडाओरड ,खरेदीची धावपळ ,प्रचंड गर्दी यांनी बाजार फुललेला असे.खरेदी झाल्यानंतर काही मजूर थोडेफार तीर्थ पान करत, मोठ्याने बोलत असत. बाजारात कधी पावसामुळे ,कधी सोसाट्याच्या वाऱ्यामुळे तर कधी एखादे मोकाट बैल ,गाई शिरल्यामुळे गोंधळ उडत असे .या गोंधळात वर मात करायची नैसर्गिक किमया सर्व दुकानदार व बाजारात येणाऱ्या लोकांनी साधलेले असल्यामुळे फारसे नुकसान न होता थोड्यावेळाने बाजार पुन्हा सुरू होई. मी उगाच थोड्या थोड्या वेळाने बाजारात फेरी मारून दुकान, विक्रेते, बाजारा करता आलेली लोक निहाळत असे. संध्याकाळी सहा सात वाजता दुकानदार आवराआवर करत पुन्हा जाताना आजोबांच्या हॉटेलवर येत चहा घेत .आजच्या झालेल्या धंदा पाण्याविषयी बोलत .पुढील आठवड्याच्या पुन्हा भेटणे विषयी बोलणे होई. कधीकधी आपसातील वादविवाद आजोबा मध्यस्थी करून ते मिटवत असत .आता बाजार पूर्ण उठलेला असे परंतु काही मजूर तीर्थपान झाल्यामुळे बाजाराचाच झोपण्या करता आसरा घेत व कधीतरी मध्यरात्री आपल्या घरी परतत.आजूबाजूच्या खेड्यांवर आलेले मजूर एकमेकाचा निरोप घेऊन परतीच्या वाटेवर लागत .गृहिणी मनासारखी खरेदी झाल्यामुळे आठवडाभर कुटुंबाला काहीतरी चांगले खायला मिळणार यामुळे सुखावले असत .लहान मुले आईचा हात धरुन एका हातात बाजारातून मिळालेली मिठाई , खेळणे खेळत सतत इकडे-तिकडे बघत आईच्या ओढण्या बरोबर चालत राहत .कधीकधी पैशांवरून किंवा इतर कारणांवरून कुटुंबांमध्ये चालता चालता वादही होत. बुधवारचा बाजार हा संपूर्ण गावाच्या ग्रामस्थांकरता तसेच पंचक्रोशी करता एक आनंददायी सोहळा असे.



शब्द संवाद

प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

## संविधानातील अधिकार आणि कर्तव्ये

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना संविधान लिहिण्याची संधी मिळाली आणि माणसाला माणूस म्हणून जगण्याचे सर्व अधिकार बाबासाहेबांनी संविधानामध्ये बहाल केले. आज आपण सक्षम, निर्भिडपणे व सन्मानाने जगत आहोत ते केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच!

आम्ही भारतीय लोक :

भारतीय राज्यघटना ही पूर्णतः लोकशाहीवर अवलंबून आहे, लोकशाही म्हणजे, लोकांनी, लोकांचे, लोकांकरिता चालविलेले राज्य होय. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. भारतीय राज्यघटनेवर विविध पाश्चात्त्य राज्यघटनेचा प्रभाव आहे. भारतीय राज्यघटना ही अत्यंत साधी, सरळ, सोपी, लिखीत व लवचिक आहे. ही जगातील सर्वात मोठी राज्यघटना आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या ४ मूल्यांवर आधारित आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी :

१९५० साली अंमलात आलेली भारतीय राज्यघटना ही मुख्यत्वे १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यावर आधारित आहे. (र्ॅीं`ष खपवळर -लीं १९३५). या कायद्यांतर्गत भारताचा अंतर्गत स्वशासनाचा पाया घातला गेला. ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट अँलन यांच्या शिष्टमंडळाने स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेची निर्मिती करण्यासाठी एका मसुदा समितीच्या स्थापनेविषयी कल्पना सुचविली व स्वातंत्र्यलढ्यात असलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी सहमती दर्शविली आणि ९ डिसेंबर १९४६ रोजी सचिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची पहिली बैठक झाली. या बैठकीमध्ये ९ महिला व २०७ सदस्य होते. त्यासाठी सर्व प्रांतातून सभासदांची निवडणूक झाली; परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत येऊ नये म्हणून काँग्रेस आणि वल्लभभाई पटेल यांनी प्रयत्न केले. वल्लभभाई पटेल तर म्हणाले की, डॉ. आंबेडकरांना संविधान समितीची सर्व दारे, खिडक्या बंद केल्या आहेत. पण बॅ. जोगेंद्रनाथ मंडळ यांच्या प्रयत्नांमुळे आणि मुस्लीम लीगच्या पाठिंब्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बंगाल प्रांतातून घटना समितीवर निवडून आले. पण स्वातंत्र्यानंतर तो प्रांत पूर्व पाकिस्तानामध्ये गेल्यामुळे बाबासाहेबांचे सदस्यपद आपोआप रद्द झाले. मग काँग्रेसचा नाईलाज झाल्यामुळे मुंबई प्रांतातून बॅ. जयकरांच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना निवडून आणावे लागले.





२९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन झाली व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समिती तयार करण्याचे अध्यक्ष (ऊेींळपस ऊेााळींशश) झाले. त्यानंतर या समितीचे कामकाज चालू झाले व कालांतराने यातील काही लोक मरण पावले, काही आजारी पडले, काही सोडून गेले. मग संपूर्ण संविधान एकट्या बाबासाहेबांनी २ वर्षे ११ महिने १८ दिवसांत अहोरात्र कष्ट करून स्वतःच्या प्रकृतीची पर्वा न करता पूर्ण केले. अनेक बैठकानंतर या समितीने अंतिम मसुदा हा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे सुपूर्द केला. तेव्हा संविधान समितीतील सभासद, मसुदा समितीतील सभासद, संविधान समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद इत्यादींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रशंसा, कौतुक व अभिनंदन केले. यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो.

यानंतर नागरिकत्व, निवडणुका व अंतरिम संसदेविषयी कामकाज व इतर बाबी तत्काळ लागू झाल्या आणि २६ जानेवारी १९५० रोजी संपूर्ण भारताचे संविधान अंमलात आले. म्हणून हा दिवस 'भारतीय प्रजासत्ताक दिन' म्हणून आपण साजरा करतो.

भारतीय संविधानाचे स्वरूप :

भारताची उद्देशिका हा भारतीय संविधानाचा मुख्य गाभा आहे. यामध्ये १२ परिशिष्टे (पुरवणी), २५ भाग आहेत. ते अनेक प्रकरणांमध्ये विभागले आहेत. ३९५ कलमे आहेत. यापैकी काही कलमे कालबाह्य झाली आहेत. सध्या भारतीय संविधानात ४५१ कलमे (जुलै २०१३) आहेत. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे व लिखित संविधान आहे.

भारताची उद्देशिका :


भारत सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक आहे. यामध्ये प्रत्येक नागरिकास सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय, न्याय, आचार-विचार, धर्म, श्रद्धा यांचे स्वातंत्र्य बहाल केलेले आहे. तसेच सर्वांना समान संधी देण्याचे अभिवचन देते. सुरुवातीला उद्देशिकेत समाजवादी, धर्मनिरपेक्ष, एकात्मता हे शब्द नव्हते, नंतर कलम ४२व्या दुरुस्तीद्वारे ते उद्देशिकेत घालण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, मनाचे स्वातंत्र्य हे सर्वात मोठे स्वातंत्र्य होय. मानवी जीवन सुखी, समाधानी व समृद्ध जगण्यासाठी मानसिक स्वातंत्र्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार व स्वातंत्र्य दिले आहे. ते भाग-३ मध्ये. संविधानामध्ये एकूण ६ मूलभूत अधिकार व हक्क दिले आहेत. ते पाहू.

**क्रमश:**

**- प्रा. डॉ. यशोधरा वराळे**

## शब्दकोडे-२४२



**आडवे शब्द**

१. प्रस्थ असलेली असामी (ला.) ५. धनादेश (इंग्रजी) ७. लॉटरी पद्धतीने निर्णय ९. सुगंधी द्रव ११. मिठाची चव १२. दाक्षिणात्य रगड्याचा महाराष्ट्रीय भाऊबंद १४. निमग्न, रममाण १५. शेराचा सोळावा भाग १६. सुगंधाची दरवळ १९. धोबी २१. पायी प्रवास २४. अरण्यवास २६. पराभव २८. माज २९. धड व पाय यांना जोडणारा सांधा ३०. वन, रान ३२. पुन्हा-पुन्हा ३५. विद्युत, बिजली ३८. बाण ३९. लोखंड घासण्याचे हत्यार ४०. हातावर मावेल एवढीच भिक्षा मागण्याचे व्रत ४१. महिरप ४२. प्रख्यात, प्रसिद्ध ४५. आकाश ४६. भ्रम ४८. गोंधळून जाणे ४९. विनंती ५१. किरकोळ सामान ५४. कठीण प्रसंग ५५. वस्तू, माल ५६. अंगावरील बारीक केस ५८अ. बंदुकीचा आवाज, बहर, हंगाम ५९. हा सात जणात वाटून खावा! ६०. कृष्णसखी ६२. निमित्त, सबब ६४. सरहद्द ६५. थोडक्यात साष्टांग नमस्कार विनंती विशेष ६७. मातापिता ७०. रहस्यमय ७१. वर्तमानपत्रातील कप्पा ७२. रविवार ७३. इजा, प्रहार ७४. घाईगर्दी (इंग्रजी) ७५. हिंदीतला खोकला ७६. जाणकार ७९. फळांचा घड, फुलांचा गुच्छ ८१. परिमाण ८२. पाण्याच्या असल्यास प्रवाह, शास्त्राची असल्यास तीव्रता ८३. उष्ण ८४. प्रमुख नावाडी

**उभे शब्द**

१. गोदाम, सरपणाचे दुकान २. अटीची भाषा ३. अभिनेता ४. धपाटा ५. सुरसुरी ६. काळी मैना ७. दांडुका ८. मुलायम, मऊ ९. अवहेलना १०. हिवाळी पिक १३. लेखणीचा पूर्वीचा प्रकार १५. बैलगाडीचा एक प्रकार १६. मोठा हातोडा १७. फार मोठे (यश) १८. चेष्टेतच धन्यता मानणारा २०. उगवत्या सूर्याचा देश २१. आवडलेला, मान्य २२. भुंगा २३. सहाय्य २५. उजेड २७. केस कापणे ३१. कडकच्या विरुद्ध ३३. जीभ ३४. नातवाची मुले ३६. जलप्रवासाचे साधन ३७. मराठीत सजा, हिंदीत शिक्षण ३९. व्यवस्था ४०. उकळी येणे ४३. सुसर ४४. जोडीतील एक चर्मवाद्य ४७. यशस्वी ४९. आजार ५०. काम झाल्यावर येणारे वाक्प्रचारातील मदतनीस ५१. संतोषजनक ५२. हजार किलो ५३. वस्तूच्या पृष्ठभागातील निघालेला छोटा तुकडा ५४. बाळाला फिरवून आणण्यासाठी गाडी ५५. सदसद्विवेक ५७. दुय्यम ५८. बाळाला निजवताना म्हटले जाणारे गीत ६१. सूर्याचे एक नाव ६३. राहणारा ६६. पूर्ण नाश करणारे ६७. नाविक दल ६८. पहिला ऋतू ६९. लाट, तरंग ७२अ. विषाची दाहकता ७७. भुसभुशीत बर्फ ७८. धेनू, गोमाता ८०. मनाला टोचणारे दुःख

### शब्दकोडे-२४१ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.वावटळ ४.मंद ६.सातदा ८.बुद्धीभेद ११.जंगम १२.मगरमिठी १३.खरा १३ब. दश १४.टरफल १५.बुकलणे १६.मकर १७.गोम १८.समृद्धी १९.माळी २०.पार २१.हरभरा २३.नाचणे २४.जतन २६.तजवीज २७.राई २८.संघ २९.वन ३१.वतन ३३.जरतर ३४.कोट ३५.सदरा ३८.क्षत्रिय ३९.पाट ४०.मजूर ४१.पत्र ४२.जड ४४.एकनाथ ४५.करा ४६.हकीम ४७.हयगय ४९.हरामखोर ५१.पत्ता ५२.म होदय ५५.डमडम ५६.परवा ५७.कारण ५८.पातक ६०.सर ६१.करवा ६३.परदेश ६५.ममता ६७.जागृत ६८.कसाब ७०.वरवर ७१.कटकट ७३.काशीद ७४.सफ द ७५.लक ७६.सुगी

**उभे उत्तर**

१.वाजंत्री २.वग ३.टमटम ४.मंगल ५.दर ६.साठी बुद्धी नाठी ७.दाखल होणे ९.भेदक १०.दशरथ १२.मफलर १३अ. राणे १७.गोरज १८.सराईत १९.माजघर २०.पातळसर २१.हजर २२.भराव २५.नवकोट नारायण २८.संतत ३०.नट ३२.नक्षत्र ३३.जयजयकार ३६.रामराम ३७.हरहरमहादेव ३९.पाक ४१.पमपम ४३.डग ४५.करामत ४८.यम ५०.खोड ५३.होकार ५४.दरवाजा ५६.परम ५८.पाचक ५९.कपबशी ६०.समरस ६१.कलकल ६२.हतभागी ६४.शरम ६६.ताकद ६९.साका ७२.टक

## सावधान! कोकणचा हापूस होतोय बदनाम!

कर्नाटक राज्यात गेल्या दहा वर्षांत आंब्याच्या बागायती मोठ्या प्रमाणावर उभ्या झाल्या आहेत. यामुळे आंबा पीकही विपूल प्रमाणात येत आहे. गुजरात, पश्चिम महाराष्ट्र या भागातही मोठ्या प्रमाणात आंबा पीक घेतले जाते. फार पूर्वी घाटमाथ्यावर नारळ पीक होत नव्हतं. पश्चिम महाराष्ट्रात नारळ होत नाहीत, असे म्हटले जायचे. कोकण, गोवा, केरळ या राज्यांची नारळाची मक्तेदारी होती. आज ती राहिली नाही. याचे कारण पश्चिम महाराष्ट्रात नारळाच्या बागाही उभ्या दिसतात. जयसिंगपूर भागातून जाताना शे-पाचशे माड उभे दिसतात. कोकणातच नारळ होतात. नारळाला खारी हवाच लागते. या सर्वाला छेद दिला गेला आहे. नारळाचं चांगलं पीक होत आहे. यामुळे कोकणात पिकणारा केवळ आंबाच नव्हे; तर सर्वच पिकांच्या बाबतीत यापुढच्या काळात स्पर्धा अधिक वाढणार आहे.

आपल्या कोकणातील फळांच्या जागी दुसरीकडच्या फळांची विक्री कोकणच्या नावे होण्याची शक्यता वाढणार आहे. त्याची सुरुवात केव्हाचीच झाली आहे. दुर्दैवाने कोकणातील आंबा, काजू व्यावसायिक सहभागी झाले आहेत. आपणच आपला हापूस आंब्याचा ब्रँड मारण्याचा प्रयत्न करीत आहोत, हे अधिक दुर्दैवी आहे. क्षणिक पैशाच्या लालसेपोटी जे काही होत आहे, हे दीर्घकालीन धोरणाला फारच मारक ठरणारे आहे. याचा विचार कोकणातील आंबा, काजू बागायतदार शेतकऱ्यांनी फार गांभीर्याने करण्याची आवश्यकता आहे. जर याकडे दुर्लक्ष केलं गेलं तर देवगडचा हापूस फळ बाजारात शोधावा लागेल. 'फळांचा राजा' म्हणून ज्याने अग्रक्रमाने स्थान मिळवले आहे, तोच हापूस आंबा त्याच्याच फळांच्या राज्यात परका होऊन जाईल.

खुल्या अर्थव्यवस्थेत जे टिकावू आहे, तेच टिकून राहील आणि जे आमच्या 'हापूस ब्रँड'वर कोणी काही करू शकत नाही, असे वाटून घेणार असतील तर या भ्रमातही त्यांनी राहू नये. मागील आंबा हंगामात हजारो कर्नाटकच्या आंबा पेट्या मुंबई-पुण्याच्या बाजारात देवगड, रत्नागिरी हापूसच्या नावे विकल्या गेल्या आहेत. हे मुंबईच्या वाशी मार्केटमध्येही घडले आहे. कोकणातील आंबा बागायतदार शेतकरीच जर सावध नसतील, तर मुंबईच्या फळबाजारातील दलाल आपल्या हापूस आंब्याची बदनामी आणि देवगड हापूसवर होणारे अतिक्रमण कसे काय रोखले जाऊ शकते? कर्नाटक आंब्याने भरल्या जाणाऱ्या आंबा पेटीवर देवगड हापूस या नावानेच बॉक्स तयार करण्यात आले आहेत. या पलीकडे जाऊन कर्नाटकमधील आंबा देवगड हापूस वाटावा यासाठी आंबा पॅकिंग करताना जी वृत्तपत्राची रद्दी वापरली जाते, ती रद्दीही कोकणातील वृत्तपत्रांची वापरली जाते. ही सर्व बनवा-बनवी कशा आणि कोणत्या पद्धतीने होते आहे हे आंबा बागायतदारांना माहिती आहेच. त्याकडे दुर्लक्ष केले जाऊ नये.

**समाप्त:**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# ‘मविप्र’तर्फे शिवप्रतिमेच्या विश्वविक्रमी ग्रंथ रांगोळीचे उद्यापासून आयोजन

## १७ हजार चौरस फुट; कुळवाडी भूषण शिवराय पुस्तकाच्या ७५ हजार प्रतींचा वापर

**नाशिक । प्रतिनिधी**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेतर्फे शिव महोत्सवाअंतर्गत भव्य १७ हजार चौरस फुटांच्या शिवप्रतिमेची विश्वविक्रमी ग्रंथ रांगोळीचे आयोजन केले आहे. यासाठी ७५ हजार पुस्तकांचा वापर करण्यात येणार आहे. सोमवार २७ नोव्हेंबर ते एक डिसेंबर पर्यंत हे रांगोळी प्रदर्शन खुले राहणार आहे. देशात पहिल्यांदाच असा उपक्रम होत असून, याची नोंद वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये होईल, असा विश्र्वास संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी काल पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

ॲड. ठाकरे म्हणाले की, एका कलात्मक, प्रयोगात्मक व वाचन संस्कृतीला बळकटी देणार्या उपक्रमाची अर्थात शिवमहोत्सवाचे आयोजन कर्मवीर बाबुराव ठाकरे अभियांत्रीकी



महाविद्यालयाच्या प्रांगणात केले आहे. येथे ७५ हजार पुस्तकांची भव्य रांगोळी साकारुन शिवाजी महाराज साकारले आहेत. श्रीकांत देशमुख लिखित 'कुळवाडी भूषण शिवराय' या ग्रंथातील छत्रपती शिवरायांचा विद्यार्थी व समाजाला दिशा देणारा वेगळा आदर्श व प्रेरणादायी इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचायला हवा. म्हणुन संस्थेने या ग्रंथाच्या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन येत्या सोमवारी सायंकाळी ५ वाजता संस्थेच्या कर्मवीर बाबुराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालयात एमकेसीएलचे प्रमुख विवेक सावंत यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी अभिनेते मिलींद गुणाजी तसेच मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु संजीव सोनवणे हे प्रमुख अतिथी राहणार आहेत. हा ग्रंथ संस्थेतील विद्यार्थ्यांना नि:शुल्क वितरित केला जाणार आहे. यावेळी सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, संचालक संदीप गुळवे, विजय पगार आदी उपस्थित होते.

**छत्रपती शिवराय स्कॉलरशिप :**

वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी, टिकावी म्हणून छत्रपती शिवराय, संत तुकाराम, महात्मा ज्योतिराव फुले, विठ्ठल रामजी शिंदे, मविप्रचे सर्व कर्मवीर यांच्या विचारांची परंपरा विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याच्या हेतूने संस्था छत्रपती शिवराय या नावाने स्कॉलरशिप सुरू करीत आहे. त्यासाठी शालेय स्तरावर वरील विभूतींच्या जीवनचरित्रावर आधारित स्कॉलरशिप परीक्षा घेतली जाईल. गुणवत्तेनुसार ही स्कॉलरशिप विद्यार्थ्यांना दिली जाईल असेही ड. नितीन ठाकरे यांनी सांगितले.

**ग्रंथ जागवी शिवस्मृती रांगोळी**

आजवर आपण अनेक रांगोळी प्रदर्शने झाले आहेत. पण ही ग्रंथ रांगोळी जगातील पहिलीच अभिनव, विक्रमी रांगोळी ठरणार आहे. 'ग्रंथ जागवी शिवस्मृती' या शीर्षकाखाली १५२ फूट लांब व ११२ फूट रुंद अशी (जवळपास १७ हजार चौरस फूट) शिवप्रतिमेची अनोखी ग्रंथ विश्वविक्रमी रांगोळी या ठिकाणी साकार होत आहे. या रांगोळीचे वैशिष्ट्य असे की कुळवाडी भूषण शिवराय या ग्रंथाच्या मुखपृष्ठाच्या तेरा विविध रंगांतील प्रतींमधून शिवप्रतिमेची ही ग्रंथ रांगोळी साकार होत आहे. रंगसंगती व कलात्मकतेचा हा अनोखा नजराणा म्हणता येईल. यासाठी सुप्रसिद्ध आर्टिस्ट सुनील धोपावकर यांचे विशेष सहकार्य लाभलेले आहे. तर संस्थेच्या ललितकला महविद्यालयाचे प्राचार्य आर्टिस्ट मुंजा नरवाडे, माध्यमिक शाळांतील चित्रकला शिक्षक जगदीश डिंगे, सोमेश्वर मुळाणे, मिलिंद पाटील, देवदत्त राऊत व चित्रकला महाविद्यालयाचे विद्यार्थी यांनी संयुक्तरित्या ही रांगोळी साकारलेली आहे.

# अखेर नाशिकच्या धरणातून जायकवाडीत पाणी सोडले

**नाशिक । प्रतिनिधी**

बर्‍याच वाद आणि गोंधळानंतर अखेर नाशिकमधील धरणांमधून जायकवाडीत पाणी सोडण्यास जिल्हा प्रशासनाने सुरुवात केली आहे. शुक्रवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास दारणा धरणातून १०० क्यूसेकने विसर्ग करण्यात आला. मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या पथकाच्या उपस्थितीत पाणी सोडण्यात आले. लवकरच नाशिक व अहमदनगर जिल्ह्यांतील धरणांमधून हळूहळू विसर्ग करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

शासन आदेशानुसार मुळा (मांडओहोळ व मुळा) प्रकल्पातून २.१०, प्रवरा (भंडारदरा, निळवंडे, आढळा, भोजापूर) प्रकल्पातून ३.३६, गंगापूर धरणातून (गोदावरी, काश्यपी, गौतमी गोदावरी), ०.५, गोदावरी दारणा (आळंदी, कडवा, भाम, भावली, वाकी, दारणा, मुकणे, वालदेवी) प्रकल्पातून २.६४३ टीएमसी असे एकूण ८.६०३ टीएमसी पाणी जायकवाडीत सोडण्यात येणार आहे. मराठवाड्यात यंदा अपेक्षित पाऊस झाला नसल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. याच पार्श्र्वभूमीवर समन्वय पाणी वाटप कायद्यानुसार अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील धरणातून पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर झालेल्या प्रशासनाच्या बैठकीत वरील धरणातून जायकवाडीत ८.६०३ टीएमसी पाणी सोडण्याचा निर्णय झाला. ज्यात नाशिक, नगरमधील गंगापूर, गोदावरी- दारणा, मुळा, प्रवरा, निळवंडे धरणातून हे पाणी सोडले जाणार आहे. मात्र, ८.६०३ टीएमसी पाणी सोडण्याचा निर्णय झाला असला तरीही प्रत्यक्षात ५ टीएमसीच पाणी जायकवाडी धरणात येणार आहे. त्यामुळे ३५ टक्के पाणी वाया जाणार आहे. तर, एकूण ५ टीएमसी पाणी आल्यावर जायकवाडी धरणाची पाणीपातळी ४४ ते ४५ टक्क्यांपर्यंत पाणीपातळी वाढणार आहे.


प्रोसेस जमा — ॲड.जगदिश बी. पगारे, धुळे
नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

**प्रोबेट अर्ज क्र. ०६/२०२३**

आशाबाई अशोक रामराजे, वगैरे .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**जाबदेणार**

कै. सुंदरबाई झिंगा अहिरे ...**मयत**

ज्याअर्थी दि.२२/११/२०२३ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार हे मयत कै. सुंदरबाई झिंगा अहिरे यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यांनी अर्जदारांचे लाभात मृत्युपत्रांचे प्रोबेट दाखला मे. कोर्टाकडुन मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौकशी तारीख ०१/०१/२०२४ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदरकामी कोणाचीही, काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाचे सही-शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : २३/११/२०२३ — आदेशावरून

**व लिपीक** / **दिवाणी न्यायालय** / **व स्तर, धुळे** — (शिक्का) — **अधिक्षक** / **दिवाणी न्यायालय** / **व स्तर, धुळे**


# अश्लील व्हिडिओवरुन ब्लॅकमेल, विश्वस्तांकडून १ कोटीची खंडणी

### कृषी सहाय्यक महिलेवर मोठी कारवाई

**नाशिक । प्रतिनिधी**

आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करण्याची धमकी देणाऱ्या कृषी सहाय्यक महिलेचे अखेर निलंबन करण्यात आले आहे. तसेच तिची खातेनिहाय चौकशी केली जाणार असल्याची माहिती देखील मिळाली आहे. या प्रकरणातील संशयित सारिका बापूराव सोनवणे (४२) हिने दिंडोरी येथील स्वामी समर्थ अध्यात्मिक पिठाचे विश्र्वस्त यांच्याकडे दहा लाखाची खंडणी मागितली होती. पैसे घेताना सारिका सोनवणेसह तिचा मुलगा मोहित बापूराव सोनवणे (२५) याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले होते. या घटनेनंतर कृषी सहसंचालकांनी सारिका सोनवणे यांच्या निलंबनाचा आदेश काढला असून तिची चौकशी केली जाणार आहे.

स्वामी समर्थ अध्यात्मिक केंद्राच्या विश्र्वस्त मंडळातील कार्यकारी सदस्य निंबा मोतीराम शिरसाट (५४) यांना बलात्काराच्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल करण्यावरुन वेळोवेळी 'ब्लॅकमेल' केले जात होते. त्यांच्याकडून सुमारे १ कोटी रुपयांची खंडणी संशयित मायलेकांनी उकळल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी गंगापूर पोलिसांनी या दोघांना अटक केली आहे. दरम्यान संशयित सारिका सोनवणे यांच्या मागे चौकशीचा ससेमिरा लागणार असून सेवा काळात कोणा - कोणाची फसवणूक केली आहे का? याची देखील चौकशी आता कृषी विभाग करणार असल्याची माहिती मिळाली आहे. निलंबित सारिका सोनवणे हिच्यासह तिचा भाऊ विनोद चव्हाण, मुलगा मोहित यांना न्यायालयात हजर केले असता १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. खंडणी प्रकरणातील मुख्य संशयित सारिका सोनवणे नाशिक जिल्हयातील निफाड येथे कृषी सहायक अधिकारी म्हणून कार्यरत होती. गेल्या ४ ऑक्टोबरपासून ती वैद्यकीय रजेवर होती. खंडणीप्रकरणी गेल्या शनिवारी (ता.१८) तिला आणि तिच्या मुलाला अटक झाली होती. आता कृषी विभागाने सारिका सोनवणे हिचं निलंबन केलं असून कृषी विभागात सेवा करत असताना कोणा कोणाची फसवणूक केली होती का ? याची देखील आता चौकशी होणार आहे. त्यामुळे आता या चौकशीतून काय निष्पन्न होते हे पाहणं देखील महत्वाचे ठरणार आहे.

# आज पंचवटीत आरपी विद्यालय प्रांगणात चंद्र नमस्कार योग साधना

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी नाशिक महानगर, भाजप योग प्रकोष्ठच्या वतीने रविवार दि.२६ रोजी सायं.६ ते ८ या वेळेत पंचवटीत दिंडोरी नाका, निमाणी बस स्टँडमागे चंद्र नमस्कार योग साधना हा कार्यक्रम होणार असल्याचे भाजप नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, भाजप योग प्रकोष्ठ संयोजक योगगुरू डॉ. प्रिती भरत त्रिवेदी यांनी पत्रकान्वये कळविले आहे.

योग साधनेतील सूर्य नमस्कार प्रमाणेच चंद्र नमस्कार हा महत्वाचा भाग आहे. महाराष्ट्रात नाशिक शहरात प्रथमच हा सामुदायिक उपक्रम होणार असून नाशिक महानगरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन प्रशांत जाधव व योगगुरू डॉ. प्रिती भरत त्रिवेदी यांनी केले आहे. शरीरातील चयापचय, सर्व शारीरिक व मानसिक व्याधी या व इतर आजारांवर हा योगसाधना उपक्रम अतिशय लाभदायक असुन या योगसाधनेच्या माध्यमामधून अनेक रुग्ण बरे होत असल्याचे डॉ. त्रिवेदी यांनी सांगितले. या कार्यक्रमास येताना नागरिकांनी मॅट, सतरंजी किंवा चटई, रुमाल, पाणी बाटली सोबत घेऊन यावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

या उपक्रमात भारतीय जनता पार्टी नाशिक महानगर, भाजप योग प्रकोष्ठ, श्री ज्ञान योग सेवा ट्रस्ट, सह्याद्री हॉस्पिटल, स्मायर फार्मा, पतंजली योग संस्था, आर्ट ऑफ लिव्हिंग, आशिर्वाद योग व नॅचरोपथी सेंटर, महाराष्ट्र योग शिक्षक संघ, प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्व विद्यालय, विविध शिक्षण संस्था आदीसह अनेक जण सहभागी होणार आहेत. सर्व नाशिककरानी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा व उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजप अध्यक्ष प्रशांत जाधव, योग प्रकिष्ठ संयोजक योगगुरू डॉ. प्रिती भरत त्रिवेदी, सरचिटणीस सुनिल केदार, नाना शिलेदार, ड. शाम बडोदे, रोहिणी नायडू वानखेडे, हिमगौरी आडके, आ. प्रा. देवयानी फरांदे, आ. सिमा हिरे, आ. ॲड. राहुल ढिकले यांनी पत्रकाव्दारे केले आहे.

# सुरगाणा तालुक्यातील श्रीभूवन गावात पहिल्यांदाच भरला आठवडे बाजार

**नाशिक । प्रतिनिधी**

सुरगाणा तालुक्यातील श्रीभूवन येथे स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच लोकनियुक्त सरपंच सुशीला गायकवाड यांच्या प्रयत्नातून आठवडे बाजार भरला होता. त्यामुळे स्थानिक रहिवाशांनी समाधान व्यक्त केले. येथील स्थानिकांना भाजीपाल्यासह इतर वस्तू आणण्यासाठी १५ ते २० किलोमीटर दूर जावे लागत होते. त्यानंतर आता त्रास आणि वेळ वाचणार असल्याने भाजीपाला विक्रेत्यांसह स्थानिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

गावात आठवडे बाजार भरल्यानंतर परिसरातील भाजीपाला उत्पादक किराणा, भेळभत्ता विक्रेत्यांनी मोठ्या प्रमाणात दुकाने थाटली होती. तसेच श्रीभूवन येथे दर मंगळवारी आठवडे बाजार भरणार असल्याने स्थानिकांसह भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना सुखकारक ठरणार आहे. तर स्थानिक प्रशासनाच्या मदतीने स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच आठवडे बाजाराची सुरुवात केल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आठवडे बाजारनिमित्त लोकनियुक्त सरपंच सुशीला गायकवाड, उपसरपंच विजय देशमुख, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


ॲड.संतोष एस. केदार, धुळे
नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मा.दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र.१३६०/ २०२३**

१. अरूणाबाई भावराव भामरे उ.व.-४३, धंदा-घरकाम,
२. विजय भावराव भामरे उ.व.-२२, धंदा-मजुरी,
३. गितांजली भावराव भामरे उ.व.-२०, धंदा-शिक्षण,
नं. १ ते ३ रा. चिचगाव, ता. जि. धुळे.
४. रेखाबाई विनोद नगराळे उ.व.-३५, धंदा-घरकाम,
रा.शिरपुर, ता. शिरपुर, जि. धुळे
५.मंजुळाबाई राहुल बोरसे उ.व.-३४, धंदा-घरकाम,
रा. दिंडोली, उधना, सुरत.
६. संगिता अमोल वाघ उ.व.-२९, धंदा-घरकाम,
रा. होमगार्ड ऑफीस जवळ, वलवाडी, ता. जि धुळे
७. वर्षा पोपट पेंढारकर उ.व.-२७, धंदा-घरकाम
रा. घुसरे, ता. शिंदखेडा, जि. धुळे.
८. रंजना धरम संदानशिव उ.व.-४०, धंदा-घरकाम,
रा. गांधली, ता. अमळनेर, जि. जळगाव
९. दिपाली सुनिल गवळे उ.व.-२६, धंदा-घरकाम
रा.सरवड, ता. जि. धुळे .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**सामनेवाला**

**आणि**

कै. भावराव दौलत भामरे (मयत) मृत्यु दि. ३०/०७/२०२२
मृत्यु ठिकाण : तिसगाव, ता. जि. धुळे. ...**मयत**

ज्याआर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात भावराव दौलत भामरे (मयत) यांचे अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार नं. १ ते ९ हे भावराव दौलत भामरे यांचे कायदेशीर वारस असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि.२१/११/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०८/०१/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो क. स्तर कोर्ट नं. ४, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २३ /११/२०२३ — आदेशावरून

**कामगिरी कारकुन** / **मे.दिवाणी न्यायालय सो.** / **व.स्तर, धुळे** — (शिक्का) — **अधिक्षक** / **मे.दिवाणी न्यायालय सो.** / **व.स्तर, धुळे**



ॲड. ललित ए. महाले, धुळे.
नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश वरिस्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३५२/ २०२३**

१) श्रीमती बेबिबाई भटू संन्याशी उ.व.-८५वर्षे, धंदा-घरकाम,
२) श्रीमती अनिता संजय संन्याशी उ.व.-५० वर्षे, धंदा-घरकाम,
३) भूषण संजय संन्याशी उ.व.-२८ वर्षे, धंदा-खाजगी नोकरी,
४) शुभम संजय संन्याशी (गडीलोहार)
उ.व.-२२ वर्षे, धंदा-खाजगी नोकरी,
वरील क्रं.१ते४ राहणार-गुरु गोविंद नगर, सोनगीर, ता.जि.धुळे.
५) सौ. नंदिनी अभिनव तारे उ.व.-२४ वर्षे, धंदा-घरकाम,
रा- मकान नं. १३/१, वार्ड नं. ४२ लेबर कॉलनी, ठाकुर प्यारेलाल मार्ग के पास, गणेश मंदिर, रुईकर वार्ड लालबाग ब-हाणपूर, मध्यप्रदेश ४५०३३१
६) श्रीमती मनिषा संजय सोनवणे उ.व.-४६ वर्षे, धंदा-घरकाम,
रा- खालचे गांव, ब्रम्ह टेक, शिरपूर, ता. शिरपूर जि. धुळे.
७) श्रीमती सुरेखा मुकेश सोनवणे उ.व.-४९ वर्षे, धंदा-घरकाम,
रा- खालचे गाव, बालाजी मंदिर जवळ, शिरपूर, ता. शिरपूर जि. धुळे. .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**जाबदेणार**

कै. भटू यादव संन्याशी (जिनगर) मृत्यू दिनांक ०६/०८/२०१८
रा. सोनगीर ता. जि. धुळे. ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर सो. याचे न्यायालयात दि.२०/११/२०२३ रोजी दि. की. अर्ज. नं.१३५२/२०२३ चा अर्ज दाखल केलेला असुन ज्याअर्थी अर्जदार हे कै. भटू यादव संन्याशी (जिनगर) यांचे कायदेशीर वारस असल्याने सदर वारस प्रमाणपत्र हे शासकीय कामासाठी, निमशासकीय, प्रशासकीय कामासाठी, खाजगी कामासाठी, वारस चौकशी अहवालकामी आवश्यक असल्याने सदरहू वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथिल मे. दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरिता पुढील चौकशी दि. २०/०१/२०२४ ही निश्चित केली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वैगेरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश साो. व. स्तर कोर्ट नं. ८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणा-या तकारची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

धुळे
दि.०९/११/ २०२३ — आदेशावरून

**कामगिरी कारकुन** / **मे.दिवाणी न्यायालय सो.** / **व.स्तर, धुळे** — (शिक्का) — **अधिक्षक** / **मे.दिवाणी न्यायालय सो.** / **व.स्तर, धुळे**


# जीवनाची खडतर वाटचाल करतांना सापडलेले सत्य गझल मधून सादर : ‘गझल विश्वास’चा अनोखा उपक्रम

**नाशिक । दिलीप साळुंके**

जीवनाची खडतर वाटचाल करतांना गवसलेले सत्य, आनंदाची व्याख्या, प्रेयसी नात्यातील व्यापकता अशा विविध विषयांवरच्या गझलांनी ‘गझल विश्वास’ मध्ये रंगत आणली. आशय, विषय याचे वेगळेपण असलेल्या गझल सादर करून रसिकांना उत्तम अनुभूती दिली. विश्वास ग्रुप व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा जलालपूर, नाशिक शाखेच्या वतीने गझल विश्वास कार्यक्रम संपन्न झाला. गझल सादरीकरणाला, लेखनाला व्यासपीठ देण्यासाठी विश्वास ग्रुपतर्फे ‘गझल विश्वास’ या अभिनव उपक्रमाचे हे अकरावे पुष्प होते.

विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास जयदेव ठाकूर यांची ‘गझल विश्वास’ची संकल्पना असून, आयोजक विश्वास



ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युटचे सचिव विनायक रानडे व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओच्या समन्वयक ऋचिता ठाकूर आहेत तर समन्वयक संजय गोरडे आहेत. सदर कार्यक्रम विश्वास हब, सावरकर नगर येथे संपन्न झाला.

सोमनाथ साखरे, नंदकिशोर ठोंबरे, हिरालाल बागुल, सचिन साताळकर यांनी गझल सादर केल्या, तर जयश्री वाघ यांनी सुत्रसंचलन केले.

सुख:दुखाचा संघर्ष आणि त्याचे जीवनात मिठासारखे स्थान याची महती सोमनाथ साखरे यांनी सादर केली.

ह्या सुखाने केवढे छळले मला,
क्रूर नाही दु:ख हे कळले मला

पंढरीच्या विठोबाच्याभाव-भक्तीचे मोठेपण समाजातल्या सर्व थरातील जनतेला सामावून घेण्याचे त्याचे देवत्व या विषयी नंदकिशोर ठोंबरे यांनी आपली रचना सादर केली.

तुझ्या या पामराची एक ही तक्रार आहे,
तुझा का पांडुरंग, रंग काळाशार का आहे?

माणूस म्हणून जगण्यासाठी आयुष्यभर मैत्रीच्या तडजोडी केल्या पण त्याला यश आले नाही त्याकडे गझलकार सकारात्मक नजरेने पाहतो हे हिरालाल बागुल यांनी आपल्या गझलेतुन सांगीतले.

जीव गेला पण तरीही वैर ना सरले,
केवढी गर्दी उसळली जाळण्यासाठी

नाते जपणे ही, दोघांची जबाबदारी असते त्यासाठी समन्वयातून आयुष्य सुंदर करता येते या विषयीची रचना जयश्री वाघ यांनी सादर केली.

बोलुन पाहू शब्द तहाचे
किती दु:ख ते रणांगणावर

जगाच्या बंधनात जगतांना मुखवटा घालून जगावे लागते त्याविषयीची गझल सचिन साताळकर यांनी सादर केली.

मजेत दिसते सगळी दुनिया
तूही सुखी असल्याचे भासव

जयश्री वाघ यांनी खुमासदार शैलीत मैफिलीचे सुत्रसंचलन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय गोरडे यांनी केले. गझलकारांचा सन्मान मधुकर गिरी व प्रविण पगार यांनी केला. गझल रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न्यूज कॉलम

### पाठलाग करीत रोखली गोतस्करी ; गुन्हा दाखल

**धुळे ।** मेहेरगाव (ता. धुळे) येथील गोरक्षक राकेश भामरे यांच्यासह इतरांनी पाठलाग करीत पिक-अप वाहनातून होणारी गोतस्करी रोखली. मेहेरगाव बसथांब्याजवळ पिक-अपला (एमएच ०४, ईबी ०५६४) पकडले. वाहनात दोन गायी व गोह्याला दोरीने बांधून कोंबून कत्तलीच्या उद्देशाने नेत असल्याचे दिसून आले. याबाबत पोलिसांना कळविल्यानंतर सोनगीरच्या पथकाने पिक-अप चालक खलील नबू पटेल (रा. चिंचवार, ता. धुळे) यास ताब्यात घेतले. तसेच ७० हजारांचे वाहन व नऊ हजारांची तीन जनावरे असा ७९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. तक्रारदार भामरे यांच्या फिर्यादीनुसार चालक खलील पटेल याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला. पोलिस नाईक गिरासे तपास करीत आहेत.

# आ. अमरिशभाई पटेल यांच्या कार्याची दखल भाजपा नेहमीच घेतय

### आ. चंद्रशेखर बावनकुळे यांचे गौरवोद्गार

**शिरपूर । प्रतिनिधी**



आमदार अमरिशभाई पटेल यांच्या कार्याची दखल भाजपा नेहमीच घेतय. त्यांच्या कार्याबद्दल, त्यांच्या विकासकामांबद्दल तसेच भाजपाच्या दृष्टीने त्यांनी केलेल्या चांगल्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर आम्ही महाराष्ट्रभर त्यांची प्रशंसा करतो. त्यांचे कार्य अफाट आहे, त्यांनी आमच्या विदर्भाकडेही लक्ष दिले तर तो आमचा बहुमान असेल असे गौरवोद्गार भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढले.

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिरपूर येथे आर. सी. पटेल फार्मसी कॅम्पस मध्ये एस. एम. पटेल ऑडिटोरियम हॉल मध्ये २३ नोव्हेंबर रोजी नंदुरबार लोकसभा अंतर्गत शिरपूर विधानसभा येथे १४२ सुपर वारियर्स बैठक संपन्न झाली.

यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश महामंत्री विजय चौधरी, उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रविंद्र अनासपुरे, खा. डॉ. हीनाताई गावित, माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, नंदुरबार लोकसभा प्रभारी डॉ. तुषार रंधे, शिरपूर विधानसभा प्रभारी प्रभाकरराव चव्हाण, तालुकाध्यक्ष किशोर माळी, सांगवी मंडळ अध्यक्ष सत्तारसिंग पावरा, तसेच जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती के. डी. पाटील, शिरपूर एज्युकेशन सोसायटी उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, जिल्हा परिषद सभापती कैलास पावरा, पंचायत समिती सभापती, तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, माजी नगरसेवक, माजी नगरसेविका, शिरपूर शहर व तालुक्यातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमापूजन करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र गीत सर्वांनी गायन केले. आ. चंद्रशेखर बावनकुळे पुढे म्हणाले की, भाईंमुळे शिरपूर शहर हे महाराष्ट्राला ऊर्जा देणारे शहरआहे. भाई हे खरे तर गॉड गिफ्ट आहेत. मला पण खूप शिकण्यासारखे आहे. शासनाच्या असंख्य योजना शिरपूर तालुक्यातील सर्वसामान्य माणसांसाठी राबविलेले भाईंचे कार्य महाराष्ट्रासाठी कौतुकाचा विषय आहे. सरकारी मदत न घेताही काम करण्याची त्यांची इच्छाशक्ती प्रचंड आहे. भाईंचा आम्हाला नेहमीच हेवा वाटतो. भाईंच्या कार्याबद्दल मी नेहमीच महाराष्ट्रभर सांगतो. भाईंच्या कार्याची दखल पक्षात सर्वांनी घेतली आहे. एकही डाग नसलेले आमदार काशिराम पावरा हे देखील भाईंच्या संस्कारानेच काम करत आहेत. शिरपूर तालुक्याने भाजपासोबत राहून पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या कार्याला पुढे नेण्यासाठी योगदान द्यावे. देशाला व महाराष्ट्राला भाजपाच्या माध्यमातून सर्वच क्षेत्रात विकसित करण्याचे प्रयत्न झाले आहेत. जगात पंतप्रधान नरेंद्र मोदीजी व आपल्या भारताला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. नंदुरबार लोकसभा मतदारसंघात व शिरपूर विधानसभा मतदारसंघात येत्या निवडणुकांमध्ये विक्रमी कामगिरी होईलच अशी अपेक्षा भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केली.

प्रास्ताविकात आमदार अमरिशभाई पटेल म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जगात खूप मोठी मजल मारली आहे. सर्वच क्षेत्रात भारताने विकासाचा उच्चांक गाठला असून आपल्याला सर्वांना आपण भारतीय असल्याचा गौरव प्राप्त होत आहे. महाराष्ट्रात भाजपाची वाटचाल दमदार सुरु असून विकास कामांसाठी भरमसाठ निधी प्राप्त होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांसाठी शासनाच्या असंख्य योजना अतिशय चांगल्या पद्धतीने राबविल्या जात आहेत.

शिरपूर तालुक्यात आम्ही आमदार कार्यालयामार्फत स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून विकास योजना आपल्या दारी अभियान मार्फत तालुक्यातील थेट शेवटच्या माणसापर्यंत योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी यशस्वीपणे काम सुरू आहे. प्रामाणिक आमदार म्हणून आ. काशिराम पावरा यांच्या प्रति आम्हाला अभिमान आहे. येत्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत शिरपूर तालुक्यातून एक लाखापेक्षा जास्त मताधिक्य मिळवून देईल असे ठामपणे आमदार अमरिशभाई पटेल यांनी आश्र्वासन दिले. भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करवंद नाका, महात्मा फुले सर्कल पासून आमदार कार्यालय पर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. शिरपूर विधानसभा प्रभारी प्रभाकरराव चव्हाण यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## तऱ्हाडी येथे विविध योजनेअंतर्गत विकास कामांचे लोकार्पण

### संसदरत्न खासदार डॉ.हिना गावीत यांच्या हस्ते उद्‌घाटन

**वरुळ । प्रतिनिधी**



येथील ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत गेल्या पाच वर्षात विविध योजनेअंतर्गत गावाचा विकास करण्यासाठी गेल्या वर्षी संसदरत्न खासदार डॉ.हिना गावित भाजपा माजी तालुकाध्यक्ष राहुल रंधे लोकनियुक्त सरपंच जयश्री धनगर व सुनील धनगर गटनेते तुळशीराम भामरे यांच्या प्रयत्नाने दोन कोटी ९२ लाख रुपयाचे विकास कामांची निधी मंजूर केला होता.

त्या निधीअंतर्गत येथील २५१५ इतर ग्रामीण विकास अंतर्गत खंडेराव मंदिर परिसर विविध सुविधा तऱ्हाडी व ममाने व अभाणपूर येथे जल जीवन मिशन अंतर्गत जल कुंभ व पाईपलाईन टाकणे ममाने गावात ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण यांचे लोकार्पण संसद रत्न खासदार डॉ हिना गावीत यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले यावेळी भाजपा माजी अध्यक्ष राहूल रंधे.जि.प. सदस्य भिमराव ईशी लोकनियुक्त सरपंच जयश्री धनगर उपसरपंच उजनताई अहिरे ग्रामपंचायत सदस्य प्रफुल्ल पाटील.मंगलबाई भील. पोलीस पाटील प्रतापसिंग गिरासे ग्रामविकास अधिकारी देविदास धाडे विलास भामरे,व ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटनेते तुळशीराम भामरे व सुत्रसंचलन ज्ञानेश्र्वर भामरे यांनी केले.

### मेथी व चिमठाणे गटाच्या पोट निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

**धुळे ।** जिल्हा परिषदेतील निवडणूक विभाग क्रमांक २२ मेथी व निवडणुक विभाग क्रमाक २३ चिमठाणे या विभागातील पोट निवडणूकांसाठीच्या अंतीम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती नायब तहसिलदार (सामान्य ) पंकज पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. या दोनही विभागातील पोट निवडणूकांसाठीच्या अंतीम मतदार याद्या राज्य निवडणूक आयोगाच्या ३ नोव्हेंबर, २०२३ च्या मतदार यादी कार्यक्रमानुसार शुक्रवार, दि.२४ नोव्हेंबर, २०२३ रोजी अंतीमरित्या प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही छापील मतदार यादी नागरिकांच्या माहितीसाठी तहसिल कार्यालय, शिंदखेडा येथे ठेवण्यात आली आहे, असेही नायब तहसिलदार (सामान्य) श्री.पाटील यांनी कळविले आहे.

## धुळे जिल्ह्यात कुष्ठ व क्षयरुग्ण शोध मोहीम प्रभावीपणे राबवावी : अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे जिल्ह्यात संशयित कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण यांना शोधुन त्वरीत उपचार सुरु करण्यासाठी शहरी व ग्रामीण भागात सक्रिय कुष्ठरुग्ण व सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम राबविण्यात येत आहे. ही शोध मोहिम जिल्ह्यात प्रभावीपणे राबवावी अशा सूचना अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण यांनी दिल्या आहेत.


जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस कुष्ठरोग विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. शितलकुमार जाधव, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सोनिया बागडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संजय मोरे, क्षयरोग अधिकारी (मनपा) डॉ. जे. सी. पाटील आदी उपस्थित होते. अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण म्हणाले की, धुळे जिल्ह्यात २० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२३ या कालावधीत सक्रिय कुष्ठ व क्षयरोग रुग्ण शोध मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण व क्षयरुग्णांना शोधून त्यांच्यावर त्वरीत उपचार सुरू करावेत. या मोहिमे दरम्यान घरोघरी भेट देवून प्रत्येक व्यक्तीची तपासणी करावी. तपासणी पथकांना प्रशिक्षण द्यावे. या मोहिमेत स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, खासगी वैद्यकीय व्यावसायिक यांना कुष्ठ व क्षयमित्र म्हणुन सहभागी करून घेत त्यांची मदत घ्यावी. आदिवासी भागातील पाडे, वस्ती, डोंगराळ भाग, वीटभट्टी या भागात प्रभावीपणे सर्वेक्षण करावे. शहरी भागात अति जोखमीच्या भागाची निवड करून प्रभावीपणे जनजागृती करावी. सर्वेक्षणात मिळालेल्या संशयित कुष्ठ रुग्ण व क्षय रुग्णांची १०० टक्के तपासणी करावी. निदान झालेल्या रुग्णांना शोधून त्यांना त्वरीत उपचार उपलब्ध करून द्यावेत. नवीन संसर्गित रुग्ण शोधून औषधोपचाराने संसर्गाची साखळी खंडित करावी. जेणेकरून या रोगाचा प्रसार थांबण्यास मदत होईल. कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण तपासणीसाठी येणाऱ्या पथकाला नागरिकांनी सहकार्य करुन जास्तीत जास्त नागरिकांनी या मोहिमेत सहभाग घेऊन तपासणी करुन घ्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी कुष्ठरोग विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. शितलकुमार जाधव यांनी या आजाराची शास्त्रीय माहिती दिली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## डॉ राजेंद्र पगारे यांची पिंपळनेर भाजपच्या शहर अध्यक्षपदी

### देवेंद्र गांगुर्डे यांची पिंपळनेर मंडळ संघटन सरचिटणीस पदी निवड

**पिंपळनेर । प्रतिनिधी**





येथील भारतीय जनता पक्षाच्या शहर अध्यक्ष पदी डॉ राजेंद्र पगारे यांची निवड झाली ते भाजपा किसान मोर्चा चे राज्य सचिव एड संभाजी पगारे यांचे बंधू तर भाजपा जिल्हा महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रा सविता पगारे यांचे पती आहेत.

देवेंद्र मुरलीधर गांगुर्डे हे पिंपळनेर गणाचे प स सदस्य असून त्यांची भाजपा पिंपळनेर संघटन सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे.तर पंकज भावसार -पिंपळनेर मंडळ युवा मोर्चा, चंद्रशेखर बाविस्कर-पिंपळनेर मंडळ उपाध्यक्ष, धनंजय पाटील-पिंपळनेर मंडळ उपाध्यक्ष, जयश्री भोये- पिंपळनेर मंडळ उपाध्यक्ष, नितीन कोतकर- पिंपळनेर मंडळ उपाध्यक्ष, देवेंद्र पाटील - पिंपळनेर मंडळ सरचिटणीस, प्रतीक कोतकर-पिंपळनेर मंडळ सरचिटणीस, प्रकाश अहिरराव-पिंपळनेर मंडळ चिटणीस, सौ मीना रवींद्र गांगुर्डे-पिंपळनेर मंडळ चिटणीस, दिलीप घरटे- पिंपळनेर मंडळ कोषाध्यक्ष पदी निवड झाली असून त्यांचे विक्की कोकणी,एड संभाजी पगारे,इंजि के टी सुर्यवंशी, वसंतराव बच्छाव, व्ही एन जिरे पाटील, प्रदीप कोठावदे यांनी अभिनंदन केले आहे

## भाजपा बेटी बचाव, बेटी पढाव अभियान पदाधिकाऱ्यांचे नियुक्त्या



### प्रदेश उपाध्यक्षा अल्पा अग्रवाल यांच्या हस्ते सत्कार

**धुळे । प्रतिनिधी**

भाजपा बेटी बचाव, बेटी पढाव अभियान जिल्हाध्यक्षा कुंतल अग्रवाल यांच्या निवासस्थानी भाजपा बेटी बचाव बेटी पढाव अभियान प्रदेश उपाध्यक्षा अल्पा अनुप अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली नुतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

यावेळी सह संयोजकपदी मंगला रुणवाल, प्रज्ञा चौधरी, रंचना शर्मा,सेवा मंत्री पदी राहुल गांधी, सह कार्यालय मंत्री संगिता भतवाल, आयटी.प्रमुखपदी अमोल अग्रवाल, सोशल मिडिया प्रमुखपदी रुपाली भावसार, सह प्रमुखपदी शैलेजा साळुंखे तसेच डॉक्टर सेल प्रमुखपदी डॉ.पिंकी शहा, वकील सेल प्रमुखपदी अँड. सारंगी गुजराती, शिक्षक सेल प्रमुखपदी भाग्यश्री पाटील, मंडल प्रभारी सदस्यपदी अभय अग्रवाल, पवण मराठे, सोनल छाजेड, निलू अहिरे, मंगला बांगड, मनिषा कोठावदे यांच्यासह युवती मंडल प्रमुखपदी पुर्वा अग्रवाल, युवक मंडल प्रमुखपदी हिमांशू अग्रवाल, कुशाग्र चौरसिया यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या सत्कार करत अभिनंदन केले.

## झेडपी अध्यक्ष राजीनामा देतच नसतील तर अविश्वास आणा

### भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंची सदस्यांना सूचना

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद अध्यक्षा अश्र्विनी पवार यांच्या राजीनाम्यावरून भाजप सदस्यांमध्ये अंतर्गत वादविवाद सुरू आहे. या प्रकरणी भाजपच्या काही सदस्यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. तसेच अध्यक्षा अश्र्विनी पवार पक्षाच्या धोरणानुसार राजीनामा देत नसल्याची तक्रार केली. या वेळी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी अध्यक्षा पवार ठरल्याप्रमाणे राजीनामा देत नसतील तर त्यांच्या विरोधात अविश्र्वास प्रस्ताव आणावा अशी सूचना केली.

भाजपच्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अश्र्विनी पवार यांचा १३ महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्याने त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी भाजपच्या काही सदस्यांनी केली आहे. त्यातून पक्षात अंतर्गत कलह वाढला आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे धुळे आणि नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले आहे. त्यांची जिल्हा परिषदेतील भाजपच्या सदस्यांनी भेट घेतली. तसेच गट नेत्या कुसुम निकम यांची स्वाक्षरी असलेले पत्र दिले. त्यात म्हटले आहे की, जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण महिलेसाठी राखीव असून १४ ऑक्टोबर २०२२ मध्ये अश्र्विनी भटू पवार यांची पक्षाच्या धोरणानुसार १३ महिन्यांसाठी अध्यक्षपदी निवड झाली होती. त्यांचा कार्यकाळ १४ नोव्हेंबरला समाप्त झाला. त्यानंतर वेळोवेळी सूचना देऊनही अश्र्विनी पवार यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिलेला नाही. पक्षातील इतर सदस्यांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी म्हणून अध्यक्षा पवार यांना राजीनामा देण्याची सूचना करावी, असे पत्र दिले.

#### राजीनामा दिला नाही तर नाईलाज

**पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी सूचना दिल्यावरही अध्यक्षांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिलेला नाही. त्यामुळे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेत कैफियत मांडली. प्रदेशाध्यक्षांनी अविश्वास प्रस्ताव मांडा अशी सूचना केली. पण अविश्वास प्रस्ताव आणणार नाही पण अध्यक्षांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिला नाही तर नाईलाज असेल.**

**- कुसुम निकम, गटनेत्या, भाजप**

...तर ठराव मांडा

या वेळी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी पक्षाच्या निर्णयाला जिल्हा परिषद अध्यक्षा अश्र्विनी पवार जुमानत नसतील तर भाजपच्या सदस्यांनी त्यांच्याविरोधात अविश्र्वास प्रस्ताव आणावा, अशी सूचना केली. या वेळी माजी मंत्री तथा आमदार अमरीश पटेल, नंदुरबारच्या खासदार डॉ. हिना गावित, भाजपचे नेते कामराज निकम, जिल्हा परिषद सदस्य आशुतोष पाटील, गोकुळ परदेशी उपस्थित होते.

## जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांना त्वरीत मंजूरी घ्यावी

### जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या सूचना

**धुळे । प्रतिनिधी**



जिल्हा वार्षिक योजनेतून होणाऱ्या विविध विकास कामांना त्वरीत मंजूरी देवून सदर कामे गतीने पूर्ण होतील यासाठी नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्यात.

आज येथील जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हा वार्षिक योजनेची सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजनांची आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री. गोयल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. या बैठकीस उपवनसंरक्षक नितीनकुमार सिंग, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त योगेश पाटील, प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.गोयल म्हणाले की, सन २०२३-२०२४ करीता प्राप्त निधीचे तांत्रिक मान्यतेचे प्रस्ताव त्वरीत सादर करुन ते प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावेत, ज्या यंत्रणेचे जिल्हा वार्षिक योजनेचे प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास अद्यापही सादर केले नाही अशा विभागांनी ती त्वरीत सादर करावीत. ज्या विभागाचा निधी अखर्चित राहणार आहे त्यांनी अखर्चित निधी परत करावा. सर्व यंत्रणेने विकासकामांच्या अंमलबजावणीसाठी योग्य नियोजन करावे. ग्रामपंचायत व नगरपालिका, नगरपंचायतीने नागरीसुविधा, तीर्थक्षेत्र सुविधा तसेच जनसुविधेची कामे प्राधान्याने घ्यावेत. मृद व जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवार योजनेतून पाझर तलावाची कामे प्रस्तावीत करावीत क्रीडा विभागाने आश्रमशाळा, जिल्हा परिषदेच्या शाळेत क्रीडा साहित्याचे वितरण करावेत. दुर्गम भागातील रस्ते, वीज, तसेच आश्रमशाळा,अंगणवाडी दुरुस्तीची कामे प्राधान्याने करावीत. जिल्हा विकास आराखडयातील निगडीत विभागाने जिल्हा विकास आराखडा सादर केला असून शासनाने या आराखड्यात काही बदल केले असल्याने या आराखड्याशी निगडीत त्या विभागाचे अल्प, मध्यम व दिर्घ मुदतीचे ध्येय निश्र्चित करुन हे ध्येय साध्य करण्यासाठी अंदाजित लागणाऱ्या निधीचे प्रसताव सादर करावेत. आगामी काळात जिल्हा वार्षिक योजनेची विभागीय तसेच राज्यसतरीय बैठक लवकर घेण्यात येणार असल्याने सन २०२४-२०२५ या वर्षांतील जिल्हा वार्षिक योजनेची सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजनांचे प्रारुप आराखडा यंत्रणेने त्वरीत सादर करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्यात. जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती हटकर तसेच प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, समाज कल्याणचे सहायक आयुक्त योगेश पाटील यांनी जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत उपलब्ध निधी व खर्चाची माहिती यावेळी दिली. बैठकीत चालू वर्षाचा मंजूर निधी व झालेला खर्च व पुढील वर्षांच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक

रविवार दि. २६ नोव्हेंबर २०२३





# भाजपच्या हक्काच्या कार्यालयामुळे कार्यकर्त्यांची सुविधा : बावनकुळे

## गजेंद्र अंपळकरांच्या कार्याचे केले कौतूक














नाशिक

। सर्वांगीण विकास हा भाजपचा अजेंडा आहे. धुळे शहराचा चौफेर विकास करण्याचे स्वप्न गजेंद्र अंपळकर यांच्यासारखे पदाधिकारी पाहतात आणि ते प्रत्यक्षात उतरवतात. तेव्हा हीच भाजपसाठी मोठी संजीवनी ठरते असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. धुळे येथील चाळीसगाव रोडवरील मारुती नगरमध्ये भारतीय जनता पक्षाच्या महानगर कार्यालयाचे भूमिपूजन तसेच हर हर महादेव व्यायाम शाळेचे भूमिपूजनही करण्यात आले. भारतीय जनता पक्षाचा धुळ्यात अत्यंत विक्रमी वेगाने विस्तार झाला.अवघे तीन नगरसेवक असलेल्या पक्षाने अनुप अग्रवाल शहर जिल्हाध्यक्ष झाल्यावर प्रचंड उभारी घेतली. पक्षाची ध्येय धोरणे समजवून सांगत इतर पक्षातील वजनदार नेत्यांचे होलसेलमध्ये प्रवेश सोहळे घडवून आणले. त्यानंतर महापालिकेत एकहाती सत्ता मिळविण्याचा विक्रमही त्यांनी साधला. मनपाच्या सत्तेचे सुकाणू आपल्या हाती घेत अग्रवाल यांनी शहरात विविध विकासाच्या कामांना गती दिली. त्यांच्या संकल्पनेतून पांझरानदी किनारी चौपाटी येथे अत्यंत सुंदर असे उद्यान उभारण्यात आले. लेझर शो सह डोळे दीपविणारे हे उद्यान असून आज लोकार्पण सोहळा चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते व ना.गिरीश महान, विजय चौधरी, खा.डॉ.सुभाष भामरे, जयकुमार रावल, आ.अमरिशभाई पटेल, माजी आ.राजवर्धन कदमबांडे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, विधानसभा प्रमुख अनुप अग्रवाल,महापौर प्रतिभा चौधरी, आयुक्त श्रीमती अमिता दगडे पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

संकलन : दिपक वाघ

CMYK
दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
रविवार, दि. २६ नोव्हेंबर २०२३




# सृष्टीच्या कणाकणात शिवाचा अंश समाविष्ट आहे

## पंडित प्रदीपजी मिश्रा यांचे प्रतिपाद

















नाशिक । महाराष्ट्राचे

प्रभू श्री रामाच्या पावन भूमीत, गोदावरी नदीच्या तिरी होत असलेल्या शिवमहापुराण कथा हे नाशिकरांनी महादेवाला अर्पण केलेला एक लोटा जलचाच प्रसाद आहे की, आज नाशिकच्या पावन भूमीत कथा संपन्न होते आहे. दरम्यान सृष्टीच्या कणाकणात शिवाचा अंश समाविष्ट आहे असे प्रतिपादन पंडित प्रदीपजी मिश्रा यांनी केले. पंडित प्रदीपजी मिश्रा यांनी आयोजकांना तयारीसाठी आठ दिवसांपेक्षा कमीचा कालावधी दिला असताना आणि या वेळेत आयोजकांनी केलेल्या तयारीबद्दल पालकमंत्री दादाजी भुसे, आविष्कार भुसे, राजू लवटे, अजय बोरस्ते, प्रवीण तिदमे, प्रशांत जाधव, रंजन ठाकरे व आयोजन समितीचे विशेष कौतुक केले. नाशिक पंचक्रोशीतून शिव महापुराण कथा ऐकण्यासाठी आलेल्या भाविकांमुळे पाथर्डी गाव व परिसरात कुंभमेळ्याचे स्वरूप आले आहे, प्रामुख्याने महिलांची संख्या लक्षणीय दिसत आहे. युवकांनी कोणतेही व्यसन न करता योग्य दिशेने वाटचाल केल्यास निश्चितच यश मिळेल, महिलांनी गृहस्थ काळात योग्य वेळेला आलेल्या सूनेकडे घराची जबाबदारी देऊन शिवभक्ती करावी, असे आवाहन पंडितजींनी कथेच्या तिसऱ्या दिवशी केले. तसेच मनुष्य आयुष्यात सर्व गोष्टींना वेळ देतो, पण आयुष्यात जेव्हा कठीण प्रसंग येतो तेव्हा फक्त शिवमहादेवच मदतीला येतो, आपले कर्मच मदतीला येते त्यामुळे थोडा वेळ शिवमहादेवाच्या सेवेला द्यावा असेही पंडितजींनी सांगितले.